Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

# प्रगत अध्ययनातील एम - लर्निंग एक संकल्पना

**प्रा. सुर्यवंशी बी. एम.,**
**प्रा. निकम एस. टी.,**
**श्री समर्थ कॉलेज ऑफ एज्युकेशन ॲण्ड रिसर्च,**
**म्हसणे फाटा ता. पारनेर जि. अहमदनगर.**

**प्रास्ताविक :-**

आजचे युग म्हणजे आव्हाणच आहे. आजचे हे आव्हान समर्थपणे पेलने हे सर्वात महत्वाचे आहे. आध्ययन अध्यापनात नविन संकल्पना येउ घातल्या आहेत. आज शिक्षणासाठी नवीन प्रयोग संशोधने हती घेतली आहे. यातून शिक्षण प्रक्रियेचा ख-या अर्थाने विकास होत आहे व या प्रक्रियेतून विदयार्थ्याचे अनुभव विश्व ख-या अर्थाने समृध्द करण्याचे धनुष्य शिक्षक म्हणून आपण समर्थपणे वाहता आहोत. याचाच एक भाग म्हणून शिक्षण प्रक्रिया अधिक व्यापक बनवण्यासाठी पारंपारिक अध्ययनास छेद देऊन नवीन तंत्रज्ञानाचा नवीन अध्यययन - अध्यापनात समावेश करण्यासाठी तसेच आजच्या आधुनिक युगात आपण विदयार्थ्याना अध्ययन समृध्द बनवण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा आपल्या अध्यापनात समावेश करण्याचा प्रयत्न करीत असतो.

अध्यापन करीत असताना विदयार्थ्यंची मानसिकता महत्वाची असते. शिक्षक विदयार्थ्यंना स्वंयम अध्ययनास प्रेरणा देण्याचा प्रयत्न करतो. यासाठी अध्यापन करताना शिक्षकाची भुमिका महत्वपूर्ण असते. विदयार्थ्यांना केंद्रित ठेवून अदययायावत व प्रगत नाविन्यपूर्ण ज्ञान देण्याचा व शिक्षण प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा समावेश करण्याचा सतत प्रयत्न होताना दिसत आहे.

याचा एक भाग म्हणजे आजचया आधुनिक व तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येक व्यक्तीच्या व विदयार्थ्याच्या हातात असलेले व सप्रेषणाचे प्रभावी माध्यम असणारे एक प्रभावी साधन म्हणजे मोबाईल होय. सर्वसाधरणपणे विचार केला तर बहुतांश विदयालय अथवा महाविदयालय आपल्या आवारात मोबाईल वापर करण्यास मनाई करतात. मात्र याच साधनाचा सुयोग्य पध्दतीने अध्ययन अध्यापनात वापर केल्यास विदयार्थ्याचे अध्ययन अधिक सुखकर करुन त्याचे अनुभव विश्व अधिक समृध्द बनविण्यास या साधनाची मदत होणार आहे.

**संकल्पना :-**

अधुनिक शिक्षण प्रणालीत विज्ञान तंत्रज्ञानाचा कृतीयुक्त वापर करणे यातून ही संकल्पना उदयास आली आहे. सर्व साधारणपणे एम- लर्निंग म्हणजे विदयार्थ्यांजवळ असणा-या भ्रमणध्वनीचा उपयोग अध्ययन अध्ययनात करणे होय.

एम - लर्निंग मध्ये कोणताही शैक्षणिक घटक व उपघटक मोबाईल व त्यात अंतभूत असलेल्या विविध सोयी सुविधाचा वापर करुन अध्ययन कर्त्या पर्यत पोहचवण्याचा प्रयत्न यामध्ये केला जातो.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

उदा. sms सेवेचा वापर करुन विदयार्थ्यापर्यंत घटकाला अनुसरुन एकादा प्रश्न पाठवला जातो. त्यावर अध्ययन करुन विदयार्थी त्याचे उत्तर sms द्वारे शिक्षकाला पाठवतो.

**व्याख्या :-**

1. M-Learning means any educational provision where the dominant technologies are handheld. - **Traxler**
२. M-Learning ही एक व्यापक स्वरुपाची संकल्पना आहे. यामध्ये सदयस्थितीत उपलब्ध विविध साधनाचा वापर करुन विदयार्थ्यांना शिक्षण प्राप्त करण्यास मदत केली जाते.
३. M-Learning मध्ये मोबाईलमधील अदयायावत तंत्राचा वापर करुन विविध अध्ययन अनुभुती देणे. उदा. स्मार्ट फोन, आय फोन, 3 G technology, wap, video calling, GPRS, tablet pc, wifi इ. तंत्रज्ञानाचा समावेशा केला जातो. या अदययावत तंत्रामुळे विदयार्थी अध्ययन करताना त्यांला भेडसावणा-या समस्या स्वत: सोडवू शकतात.

**अध्यापन पध्दती :-**

M-Learning मध्ये शास्त्रीय पध्दतीचा वापर करण्यावर भर देण्यात आलेला आहे. त्याच प्रमाणे समस्या निराकरण तंत्राचा वापर केला जातो. अध्ययन अध्यापनात ध्वनी चित्रे चलचित्रावर अधिक भर देऊन अध्ययन प्रक्रिया राबविली जाते. या व्यतिरिक्त चित्रालेख प्रतिके तसेच चलचित्रांवर आधारित अनुदेशनात्मक अध्ययनावर भर देण्यात आलेला आहे.

**कार्यपध्दती :-**

M-Learning मध्ये विदयार्थी अध्ययन करीत असताना अध्ययनात अडचण निर्माण झाल्यास विदयार्थी मोबाईलचा वापर करुन शिक्षकाशी संप्रेषण प्रस्तापित करुन आपल्या समस्येबाबत शिक्षकाशी तसेच स्वय अध्ययनार्थींशी चर्चा व सल्ला मसलत करुन आपल्या शंकेचे वा समस्येचे निराकरण करुन आपली अध्ययन प्रक्रिया पूर्ण करतील.

M-Learning मध्ये विदयार्थी आपल्य सवडीच्या वेळेनुसार अध्ययन करु शकणार आहे. त्यामुळे विदयार्थी आपल्या फावल्य वेळेचा सदउपयोग करुन अध्ययन करणार आहे. याचा उपयोग दुरस्थ शिक्षणासाठी देखील होणार आहे.

शिक्षक विदयार्थ्यांला घटक मोबाईलद्वारे देऊन त्या घटकावर आधारीत प्रश्न विचारतील प्रश्नाची उत्तरे विदयार्थ्यने दिल्यानंतर त्यावर आधारित चर्चा करुन पुढील मार्गदर्शन करतील.

**संप्रेषण पक्रिया :-**

M-Learning मध्ये संप्रेषण हा अतिशय महत्वपूर्ण घटक वा प्रक्रिया आहे कारण प्रभावी संप्रेषणा शिवाय प्रभावी

अध्ययन होऊ शकणार नाही.

अनुदेशक ⟷ अध्ययनार्थी

अध्ययनार्थी ⟷ अध्ययनार्थी

यामध्ये विदयार्थी त्याच्या सवडीनुसार मोबाईल नेटवर्कचा वापर करीन संप्रषण घडून आणतील.

उदा. या अंतर्गत विदयार्थ्यांना दररोज प्रश्न पाठवणे विदयार्थी त्याला उत्तर देतो. उत्तर तपासले जाते व अभिप्राय पाठवला जातो. अशाप्रकारे विदयार्थी अध्ययन करतो. या अध्ययन प्रक्रियेमध्ये वेळेची कुठल्याही प्रकारची मर्यादा नसल्यामुळे अध्ययन कर्ताच्या सवडीनुसार अध्ययन प्रक्रिया घडून येते.

**M-Learning वैशिष्टये :-**

- नाविन्यपूर्ण संकल्पना
- विविध साधनांचा एकाच वेळी वापर
- प्रभावी संप्रषण
- शास्त्रीय पध्दतीचा वापर
- मोबाईल तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण
- लवचिता
- वस्तुनिष्ठता

**M-Learning ची उपयुक्तता वा फायदे :-**

M-Learning ख-या अर्थाने शिक्षण क्षेत्रात प्रगतशील साधन ठरत आहे. M-Learning चा वापर वाढल्याने शिक्षण प्रक्रिया अधिक गतीमान होत आहे. आज काही आंभियांत्रिकी माहिवदयालयातील प्रकल्पासाठी वापर होताना दिसतो आहे. M-Learning उपयुक्तता पुढीलप्रमाणे सांगता येईल.

- अध्ययननार्थ्याची सृजनशीलता विकसीत करण्यासाठी
- औपचारिक शिक्षण
- दुरस्थ शिक्षण
- शाालाबाहय विदयार्थ्यांसाठी
- स्वयं- अध्ययनास प्रेरणा

- सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनासाठी
- विविध विषयांच्या अध्यापनासाठी
- वाणिज्य शाखेसाठी
- व्याख्याने, चर्चासत्रे रेकॉर्ड करण्यासाठी
- विविध शैक्षणिक कार्यक्रम डाउनलोड करण्यासाठी
- माहिती साठवून ठेवण्यासाठी उपयुक्त
- विविध स्वरुपाचे आलेख, आकृत्या, चित्रे तयार करण्यासाठी

**M-Learning येणारे अडथळे :-**

ही एक प्रगत अध्ययनामध्ये अधुनिक व अतिशय उपयुक्त संकल्पना असली तरी देखील या संकल्पनेचा वापर करताना काही अडथळे आहेत.

- मोबाईल संच पुरविण्याची समस्या
- उपकरण हातळण्याची समस्या
- शिक्षकाचे प्रशिक्षण
- मोबाईल संचाचे वाढते मूल्य
- पालकाचा दृष्टिकोन
- पालक - शिक्षक समन्वयक
- मोबाईलचा गैरवापर
  - इंटरनेटची सुविधा

**समारोप :-**

थोडक्यात ही एक पारंपारिक अध्ययनाला छेद देणारी नवीन संकल्पना आहे. विदयार्थ्यांचे अनुभव विश्व समृध्द बनविण्यासाठी अतिशय महत्वाची भुमिका निभाऊ शकते. भविष्याचा व उदयाचा विचार करता मोबाईल व त्यतील विविध साधनाचा जर शिक्षण प्रक्रियेत वापर केला तर निश्चितच शिक्षण क्षेत्रात क्रांती घडून येईल यासाठी शिक्षकाचा तसेच पालकांचा दृष्टिकोन सकारात्म असणे महत्वाचे आहे. शिक्षकाने अध्ययन अध्यापन प्रक्रियेत अशा नवनवीन तंत्राचा वापर केला शिक्षण प्रक्रिया गतीमान होण्यास मदत होईल.